दिनांक ०७/०७/२०२२

**प्रसिध्दी पत्रक**

**आ.लो.से. श्री. विजय पिराजी जोंधळे, वय 47 वर्षे, पद-ग्रामविकास अधिकारी,नेमणूक- वरठाण ता. सोयगांव जिल्हा औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन रु.5000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सोयगाव,औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री. विजय पिराजी जोंधळे, वय 47 वर्षे, पद-ग्रामविकास अधिकारी,नेमणूक- वरठाण ता. सोयगांव जिल्हा औरंगाबाद, रा. गाडगेबाबानगर जुना अंतुरलीरोड पाचोरा जिल्हा जळगांव. |
| लाच मागणी रक्कम | :- | 5,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 5,000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. संदिप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे आईचे व इतर तिन लोकांचे रोजगार हमी योजना अंतर्गत चालु असलेल्या विहिरीवर काम करणाऱ्या मजुरांच्या हजेरी पटावर सही करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे आईचे व इतर तिन लोकांचे रोजगार हमी योजना अंतर्गत चालु असलेल्या विहिरीवर काम करणाऱ्या मजुरांच्या हजेरी पटावर सही करण्यासाठी आ.लो.से. विजय जोंधळे यांनी लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, आ.लो.से. जोंधळे यांनी 5,000/- रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 07/07/2022 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. विजय जोंधळे यांनी पंच साक्षीदारासमक्ष ठरलेली लाचेची रक्कम 5000/- रुपये वरठाणगाव चौफुली ता. सोयगाव जिल्हा औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे. सोयगाव,औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदिप राजपुत यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोअं/केवलसिंग घुसिंगे, प्रकाश घुगरे, रविंद्र काळे, शिरीष वाघ, भुषण देसाई, चालक-चंद्रकांत बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 8888807299 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644944

पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद.